


दक्षिण ध्रुव महत्त्वाचा का?
* चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अनेक प्रचंड मोठी विवरे आहेत. त्यामुळेच या भागात आतापर्यंत उतरणे एकाही देशाच्या यानाला शक्य झाले नव्हते. * दक्षिण ध्रुवावरील अजस्त्र विविरांमध्ये मोठ्या प्रमाणात बर्फ असल्याचे पुरावे संशोधकांना मिळाले आहेत.
या बर्फाच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब झाले आणि तो बाहेर काढून वापरणे शक्य झाले, तर भविष्यातील अंतराळ मोहिमांसाठी त्याचा उपयोग करता येईल. * बर्फ वितळवून पिण्यासाठी तसेच उपकरणे थंड करण्यासाठी लागणाऱ्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल.* पाण्याचे विघटन करून इंधन म्हणून हायड्रोजन आणि श्वसनासाठी ऑक्सिजनची निर्मिती करता येईल.



# चंद्रावर भारताचा 'विक्रम'!

## 'इस्रो'च्या अंतराळ भरारीने अवघे जग थक्क

**चंद्रयान-३च्या 'विक्रम' लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर अलगद अवतरण केले आणि भारताने नवा इतिहास घडवला.**

RNI NO. MAHMAR/2023/84162

# यश सिद्धि न्यूज

वर्ष १ ले ● अंक ९७ वा ● गुरुवार २४ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/- YASH SIDDHI NEWS

| * Volume 1 | Issue 97 | Date : 24/08/2023 | blow : Thursday Page 4 | Price 4

बंगळूरू : अठराशे किलोचे वजन आणि अब्जावधी भारतीयांच्या आशाआकांक्षांसह १४ जुलै रोजी पृथ्वीवरून झेपावलेल्या चंद्रयान-३च्या 'विक्रम' लँडरने चंद्राच्या पृष्ठभागावर अलगद अवतरण केले आणि भारताने नवा इतिहास घडवला. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने (इस्रो) जाहीर केलेल्या अचूक वेळेवर, सायंकाळी सहा वाजून चार मिनिटांनी चंद्रयान चंद्राच्या पृष्ठभागाला स्पर्श करत असतानाचा सोहळा 'लाइव्ह' पाहणाऱ्या कोट्यवधी भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आला.

चंद्रावर पोहोचण्याची किमया करणारा भारत हा चौथा देश असला तरी चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर 'पाऊल' ठेवणारा भारत पहिलाच. चार वर्षांपूर्वी याच महत्त्वकांक्षेनिशी चंद्रावर झेपावलेले 'चंद्रयान २' चंद्राच्या अगदी जवळ असताना कोसळले होते. मात्र, त्या अपयशातून धडा घेत नव्या जिद्दीने, अधिक ताकदीने चंद्रावर पोहोचलेले 'चंद्रयान ३' संभाव्य जलस्रोतासह चंद्रावरील असंख्य रहस्यांचा भेद करेल, अशी आशा आहे. अमेरिका, चीन, रशिया या बलाढ्य देशांच्या कोट्यवधी डॉलर खर्चाच्या अनेक मोहिमांतूनही जे साध्य झालेले नाही ते अवघ्या सहाशे कोटी रुपयांत 'इस्रो'च्या शास्त्रज्ञांनी साध्य करून दाखवले. १४ जुलै रोजी 'मार्क-थ्री' या प्रक्षेपणयानाच्या मदतीने पाठवण्यात आलेल्या चंद्रयानाने ४१ दिवसांच्या प्रवासात एकदाही निर्धारित मार्गावरून न ढळता, एकही टप्पा न चुकवता चंद्राला गाठले होते. तीच अचूकता बुधवारी अवतरण मोहिमेदरम्यान दिसून आली.

चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ हे वैज्ञानिक नाट्य रंगले असताना संपूर्ण देश, जगभरातील शास्त्रज्ञ आणि अन्य देशांमध्ये वसलेले भारतीय नागरिक श्वास रोखून याचे थेट प्रक्षेपण बघत होते. चंद्रयान-२ याच टप्प्यावर अयशस्वी होऊन चंद्राच्या पृष्ठावर कोसळले होते. त्यामुळे यावेळी काय होणार, याची धाकधुक प्रत्येकाच्या मनात होती. अखेर ६.०४ वाजता 'विक्रम'चे पाय चंद्राला टेकल्याचे स्पष्ट झाल्यानंतर बंगळुरूमधील नियंत्रणकक्षात टाळ्यांचा कडकडाट झाला. इस्रोमधील शास्त्रज्ञ-तंत्रज्ञांच्या या जल्लोषात क्षणार्धात प्रत्येक देशवासीय सहभागी झाला. 'ब्रिक्स' परिषदेसाठी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे गेलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्य प्रणालीद्वारे 'इस्रो' नियंत्रणकक्षाशी जोडले गेले होते. मोहीम फत्ते होताच पंतप्रधानांनी । **पान २ वर**

हा क्षण ऐतिहासिक असून विकसित भारतासाठी वाजवलेला हा बिगुल आहे. पृथ्वीवर भारताने एक संकल्प केला आणि चंद्रावर त्याची पूर्तता केली. आजवर कोणत्याही देशाला जमले नाही ते भारताने करून दाखवले. **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

चंद्रयान-१पासून हा प्रवास सुरू झाला. चंद्रयान-२चे मुख्य यान अद्याप चंद्राच्या कक्षेत असून आपल्या संपर्कात आहे. चंद्रयान-३च्या यशाचा जल्लोष करताना या दोन मोहिमांसाठी मेहनत घेतलेल्यांची आठवणही ठेवली पाहिजे. **– एस. सोमनाथ, अध्यक्ष, इस्रो**

# दहावी-बारावी बोर्डाची परीक्षा आता दोन टप्प्यात!

## ज्या विषयांचा अभ्यास पूर्ण झाला, फक्त तेच पेपर देण्याचं स्वातंत्र्य

नवी दिल्ली : दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा आता दोन टप्प्यात होणार आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्रालय आज याबाबतचा निर्णय घेतला आहे. आगामी शैक्षणिक वर्षांपासून बोर्ड परीक्षासंदर्भात मोठा बदल होणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची ब्ल्यू प्रिंट तयार करण्यात आल्याची माहिती बुधवारी शिक्षण मंत्रालयाने दिली. आता २०२४ च्या शैक्षणिक सत्रासाठी पाठ्यपुस्तके तयार केली जाणार आहे.



त्याशिवाय बोर्ड परीक्षा दोन टप्प्यात होणार आहेत. ज्या विषयांचा अभ्यास पूर्ण झाला, फक्त तेच पेपर देण्याचं स्वातंत्र्यही देण्यात येणार आहे.

त्याशिवाय अकरावी आणि बारावीला दोन भाषा अनिवार्य करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये एका भारतीय भाषेचा समावेश असायला हवा, अशी अट घालण्यात आली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने काय काय निर्णय घेतले याबाबत जाणून घेऊयात..

बोर्ड परीक्षा आता वर्षातून दोन टप्प्यात होणार आहे. विद्यार्थी दोन्ही वेळा परीक्षा देऊ शकतात, सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातील. । **पान २ वर**

# मोहोळ जवळील यावली येथील अपघातात चार भाविक ठार

मोहोळ/प्रतिनिधी: मोहोळजवळील यावली गावाजवळ मालट्रक व कारच्या धडकेने झालेल्या भीषण अपघातात चारजणांचा मृत्यू झाला असून सहाजण जखमी झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास घडली. हे सर्व भाविक अहमदनगरहून तुळजापूरला दर्शनासाठी जात होते. बुधवारी, पहाटे ४.३० वाजता यावली गावाजवळच्या हॉटेल सरगमसमोर पुण्याहून सोलापूरच्या दिशेने इको कार क्र.एम.एच. ४६/ ए.पी. ४१२० ही सोलापूरच्या दिशेने जात असताना, समोर जाणाऱ्या अज्ञात वाहनास धडक लागल्याने त्यात ईको कारमधील चालक आदमअली मुनावरअली शेख (वय ३७), हिराबाई रामदास पवार (वय ७५) कमलाबाई मारूती वेताळ (वय ६०, सर्व रा. रांजनगाव मशीद, ता. पारनेर, जि. अहमदनगर) हे गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाले व द्वारकाबाई नागनाथ गायकवाड (वय ४० रा. रांजनगाव मशीद) ही सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचार सुरू असताना मयत झाली आहे. तसेच ईको कारमधील बाळी बाबू पवार (वय २७), छकुली भीमा पवार (वय २७), साई योगिराज पवार (वय ७), मंदाबाई नाथा पवार (वय ५२), सुरेखा भारत मोरे (वय ४५), बायजाबाई रामदास पवार (वय ६०, सर्व रा. रांजनगाव मशीद) हे जखमी झाले असून त्यांच्यावर सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचार सुरू आहेत. यातील एका भाविकाची प्रकृती चिंताजनक आहे. सर्व जखमींना १०८ क्रमांक ॲम्बुलन्समध्ये डॉ. रईस शेख व पायलट दिनेश निंबाळकर यांनी सोलापूरला आणले. अपघातग्रस्त कार चक्काचूर झाला होता. घटनास्थळी रक्त सांडले होते. मोहोळ पोलीस टोलनाक्याचे पेट्रोलिंग ऑफिसर मल्लिकार्जुन बजुलगे पोलीस ठाण्यात अपघाताची माहिती दिली. या घटनेमुळे अहमदनगर जिल्ह्यातील रांजनगाव मशीद गावावर शोककळा पसरली आहे. सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात जखमी भाविकांच्या नातेवाइकांनी गर्दी केली होती

# इस्त्रोचा असाही विक्रम, ७० लाखांपेक्षा जास्त लोकांना पाहिले यू ट्यूबवरुन पाहिलं चांद्रयान-३ चं लँडिंग

नवी दिल्ली : आज भारतासाठी अभिमानाचा आणि गर्वाचा क्षण आहे. सायंकाळी ६ वाजून ०४ मिनिटांनी चांद्रयान ३ चे चंद्रावर यशस्वी लँडिंग झाले. चांद्रयान ३ च्या यशस्वी लँडिंगकडे भारतासह जगभरातील नागरिकांचे लक्ष होते. इस्त्रोने या मोहिमेचं यू ट्यूबवरुन लाईव्ह प्रेक्षपण केले होते. याला मोठा प्रतिसाद मिळाल्याचे समोर आलेय. चांद्रयान ३ च्या लँडिंगचे दृश्य ३० लाखांपेक्षा जास्त लोकांनी यू ट्यूबवरुन पाहिले. हा जागतिक विक्रम झालाय. इस्त्रोच्या यू ट्यूबने स्पेनच्या इबाई ( Ibai) चा विक्रम मोडीत काढला आहे. खलरळ च्या यू ट्यूबला ३४ लाख लोकांना एकाच वेळी पाहिले होते. हा विक्रम मोडीत निघाला आहे. इस्त्रोच्या कामगिरीनंतर जगभरातून भारतीयांचं अभिनंदन केले जातेय. पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्त्रोच्या शास्त्रांचे कौतुक करत देशवासीयंचं अभिनंदन केले. चांद्रयान ३ चं यशस्वी लँडिंग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दक्षिण आफ्रिकामधून व्हर्चुअल माध्यमातून पाहिले. 'चांद्रयान-३'ची मोहिम यशस्वी झाल्याबद्दल आनंद व्यक्त करुन पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, हा देशासाठी अभिमानाचा आणि गर्वाचा क्षण आहे। **पान २ वर**

# चांद्रयान ३ च्या यशस्वी लँडिंगनंतर राज्यभरात जल्लोष

मुंबई : चांद्रयानच्या यशानंतर राज्यासह देशभरात आनंद साजरा केला जात आहे. चांद्रयानातील विक्रम लँडरने चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ सॉफ्ट लँडिंग केली आहे. यामुळे चंद्रावर लँडिंग करणारा भारत हा चौथा देश ठरला आहे. तर, चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ उतरणारा भारत हा पहिलाच देश ठरला आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात या क्षणी वेगळाच आनंद पाहायला मिळत आहे.चांद्रयानच्या यशस्वी लँडिंगचा वर्ध्यात उत्साह पाहायला मिळाला. यावेळी खासदार रामदास तडस, भाजपचे जिल्हाध्यक्ष सुनील गफाट यांसह अनेकांनी लाईव्ह प्रक्षेपण बघत यशस्वी लँडिंग होताच वर्ध्यात जल्लोष साजरा केला आहे. यावेळी खासदार तडस यांनी लाडू भरवून आनंद व्यक्त केला. चांद्रयान चंद्रावर





पोहचण्याचा आनंद सर्वत्र व्यक्त होत असताना वर्ध्यातील हा जल्लोष देखील इस्रोमधील वैज्ञानिकांचं अभिनंदन करणारा आहे.चांद्रयान-३ने यशस्वी लँडिंग केल्यानंतर जळगावमध्ये मोठा जल्लोष करण्यात आल्याचं पाहायला मिळालं. ढोल-ताशाच्या गजरात आणि पेढे वाटून जय गणेश मित्र मंडळ यांच्या वतीने जळगाव शहरातील नेहरू चौकात हा जल्लोष करण्यात आला. मोठ्या संख्येने तरुण या निमित्ताने जल्लोष करण्यासाठी रस्त्यावर उतरल्याचं पाहायला मिळालं. भारत माता की जय, वंदे मातरम् च्या जयघोषानेने अवघं जळगाव शहर दुमदुमलं.

चांद्रयान मोहीम यशस्वी झाल्यानंतर मंत्री गिरीश महाजन यांच्या समर्थकांकडून देखील जळगाव शहरातील त्यांच्या कार्यालयसमोर चांद्रयानची प्रतिकृती साकारून त्या पुढे फटाक्यांची आतिशबाजी करत जल्लोष साजरा करण्यात आला आहे.

चांद्रयान-३ मोहीम यशस्वी झाल्यानंतर संपूर्ण देशभरात जल्लोष साजरा करण्यात येत आहे. नाशिकच्या मनमाड येथे आमदार सुहास अण्णा कांदे यांच्या संपर्क कार्यालयाबाहेर शिवसैनिकांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला. यावेळी हातात भारताचा राष्ट्रध्वज घेवून 'भारत माता की जय..वंदे मातरम..हिंदुस्थान जिंदाबाद'च्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. इस्रोचे सर्व शास्त्रज्ञ आणि तमाम भारतीयांचं यावेळी अभिनंदन करण्यात आलं. रत्नागिरीमध्ये देखील चांद्रयान मोहीम यशस्वी ठरल्यानंतर जल्लोष करण्यात आला. रत्नागिरी शहरातील हिंदुहृदयसम्राट ठाकरे तारांगण येथे । **पान २ वर**

# कासाळगंगा नदी प्रदूषण मुक्त करून बारमाही वाहती करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत : जिल्हाधिकारी मनिषा आव्हाळे

## नदी प्रदुषण रोखण्यासाठी साठी प्लास्टिक मुक्तीची शपथ देण्यात आली




सोलापूर/प्रतिनिधी: कासाळगंगा नदी प्रदुषण मुक्त करून नदी बारमाही वाहती करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत. नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाची कामे तात्काळ पूर्ण करावीत. कासाळगंगा नदीचा परिसर प्लास्टिक मुक्त करा. स्वच्छ पर्यावरणासाठी नदीला जाणून घ्या, असे आवाहन प्र. जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी केले.

कासाळगंगा नदी लोक अभ्यास व कृती अहवाल अंतर्गत आज नियोजन बैठकीत प्रभारी जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे मार्गदर्शन करत होत्या. जलतज्ञ राजेंद्र सिंह हे स्वीडन वरून ऑनलाईन द्वारे बैठकीस उपस्थित होते. तसेच उप वनसंरक्षक धैर्यशील पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, यशदाचे निवृत्त संचालक सुमंत पांडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, जलजीवन मिशन चे प्रकल्प संचालक अमोल जाधव, सिने अभिनेते व ब्रॅन्ड अँबेसिडर चिन्मय उदगीरकर व ऋतुजा बागवे व्हीसी द्वारे तर चला जाणूया नदी उपक्रमांचे राज्य कार्यकारिणी सदस्य महेंद्र महाजन, श्रीधर कुलकर्णी, गटविकास अधिकारी प्रशांत काळे बैठकीस उपस्थित होते.

प्र.जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे म्हणाल्या की, नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन कामे पुर्ण करा. नदीच्या क्षेत्रातील सर्व ग्रामपंचायतींनी पंधरावा वित्त आयोग व इतर निधीचे संयोगिकरण करावे. कृती अहवालातील उपाय योजनांच्या कामाचे नियोजन करा. कासाळगंगा नदीचा परिसर प्लास्टिक मुक्त करा. स्वच्छ पर्यावरणासाठी नदीला जाणून घ्या. नदीकाठच्या परिसरात वृक्ष संवर्धन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.कासळगंगा प्रकल्प जिल्ह्यासाठी नव्हे तर राज्यासाठी पथदर्शी असल्याचे उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यांनी सांगितले. तर टास्क फोर्सचे अध्यक्ष व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी कासाळगंगा नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी । **पान २ वर**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## * सुविचार *

मनात ध्येयाची ऊर्मी असेल तर पायात धावण्याची गती येते.

## संपादकीय

### चांगले पालक होण्यासाठी...

जीवनात यशाच्या शिखरावर घेऊन जाण्यासाठी उत्तम दर्जाची शाळा हवी का? त्याला शिकवणी लावायला हवी का? त्याला आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडणारे साधन साहित्य हवे का? त्याला खेळण्यासाठी महागडे साहित्य हवे का? त्याला खूप छान छान कपडे हवे की महागडे अलंकार हवेत? काय दिले म्हणजे त्याला यशाचे शिखर पादाक्रांत करता येईल? आपण पालक म्हणून त्याला उंच भरारी घेता यावी याकरिता सर्व काही करत जातो. मात्र, नेमके जे करायचे असते तेच होत नाही. मुलांना कधीच महागड्या वस्तूंची, महालवजा शाळांची गरज नसते. त्यांना गरज असते ती फक्त आई, बाबांच्या वेळेची. त्यांना भूक असते प्रेमाची. कुशीत घेऊन गप्पा मारणारे आई-बाबा हवेत. झोपताना गोष्ट सांगणारी, अंगाई गीत गाणारी, शाळेत काय शिकला हे विचारणारी, मुक्त संवाद साधत बोलणारी, ऐकून घेणारी, बोटाला धरून मनपसंत प्रवास करणारी प्रेमाची माणसे हवीत. हे सर्व राहून जाते आणि पैशाने जे मिळते ते सर्व दिले जाते. ते सारे पूरक असते. पूरक असलेल्या गोष्टीने केवळ पोट भरते, पण त्याने बाळसे येत नाही. बालकांच्या वाढ आणि विकासाकरिता पालकांचा 'क्वॉलिटी टाइम' अधिक गरजेचा असतो. मुलांच्या शिक्षणासाठी साधनांची गर्दी नको, तर आई-बाबांचा वेळ हवा. बालकांच्या सोबत खरेच असे कधी करतो का? आपण त्यांना वेळ देऊ शकत नसू आणि अशा वाटांचे दर्शन घडवत नसू तर बालकांच्या वाटा चुकल्या आहेत, असे म्हणण्याचा अधिकार आपण गमावलेला असतो हे लक्षात घ्यायला हवे. बालकाचा विकास आणि शिक्षण उत्तम होण्याकरिता भावनिक बुध्दिमत्तेचे विकसन महत्त्वाचे आहे. त्याकरिता जे जे म्हणून करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न पालकांनीच करायला हवा. कित्येक पालकांना सोशल मीडियाचे व्यसन लागले आहे. यामुळे त्यांच्या पाल्याकडे नेहमीच त्यांचे दुर्लक्ष होत आहे. मुलांना विकसित करण्यासाठी पैसा नाही, तर पैशाच्या किमतीचा वेळ द्यायला हवा. मुलांशी बोलायला हवे, गप्पा मारायला हव्यात, त्याच्यासोबत लहान बनायला हवे. आपणच त्याचे बोट पकडत चालू लागलो तर आपल्यालाही आनंदाच्या वाटा सापडत जातील. आपण मुलांमध्ये रस घ्यायला हवा, त्याच्या गालावरून, डोक्यावरून, पाठीवरून हात फिरवत फक्त लढ म्हणायला हवे. तुम्ही तुमच्या क्लबमध्ये जाण्यापेक्षा मुलाला बागेत घेऊन जा. गप्पा मारत बसण्यापेक्षा मुलाला प्राणी दाखवा, वर्तमानपत्रात घुसण्यापेक्षा मुलांचे बोलणे ऐका.

## पशुधनाची काळजीपूर्वक सुश्रुषा करा, लम्पी चर्मरोगावर मात करा

गोवंशीय पशुधनामध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने पशुपालकांनी आपल्या पशुधनाची काळजी घेऊन त्यांची योग्य सुश्रुषा करणे गरजेचे आहे. २० टक्के औषधोपचार व ८० टक्के सुश्रुषा या सुत्रानुसार लम्पी चर्मरोगावर मात करता येते. जिल्ह्यातील पशुपालकांनी आपल्या पशुधनाची योग्य काळजी घेऊन उपचार घेतल्यास लम्पी चर्मरोगापासून पशुधन वाचविण्यात यश मिळेल.

**आहारविषयक काळजी** रोगी जनावरांची प्रतिकारशक्ती उत्तम राहण्यासाठी संतुलित आणि सकस आहार नियमित देण्यात यावा. त्याचप्रमाणे जनावरांचा आहार व पाणी पिणे उच्चतम राहील यासाठी पशुपालकांनी काळजी घ्यावी. आजारी जनावरांना हिरवा, मऊ व लुसलुशीत चारा तसेच चांगल्या प्रतीचा प्रथिने व ऊर्जायुक्त खुराक (ढेप/ मका आदी) द्यावा. पिण्याचे स्वच्छ पाणी मुबलक प्रमाणात वारंवार उपलब्ध करून द्यावे. पाण्यामध्ये मीठ व गूळ टाकून दिल्यास जनावर पाणी आवडीने पितात. तसेच त्यांना खनिजक्षार व ऊर्जा मिळेल. थंडीच्या काळात हलके कोमट पाणी दिल्यास जनावर आवडीने पाणी पितात. पाणी पिणे चालू राहिल्यास अत्यवस्थ जनावरसुद्धा तंदुरुस्त होते. ज्या बाधित जनावरांना मान, पाय, छातीवरील सुजेमुळे मान खाली करता येत नाही, अशा जनावरांना चारा व पाणी तोंडाच्या उंचीवर उपलब्ध करून देण्यात यावे. गरजेप्रमाणे चारा हाताने खाऊ घातल्यास रोगी जनावर चारा खात असल्याचे दिसून आले आहे.



**पूरक खाद्यपदार्थांचा अंतर्भाव**

आजारी जनावरांनी चारा खाने कमी केले असेल तर अशा जनावरांना ऊर्जावर्धक (प्रोपायलीन, ग्लायकॉल) औषधे तोंडावाटे देण्यात यावीत. रोगप्रतिकारशक्ती चांगली ठेवण्यासाठी आहारात नियमितपणे जीवनसत्वे, खनिजक्षार मिश्रण, प्रतिकारशक्ती वर्धक तसेच यकृतवर्धक औषधे देण्यात यावीत. रक्तशय झालेल्या जनावरांना रक्तवर्धक औषधे सकाळी, संध्याकाळी किमान २१ दिवस देण्यात यावीत. ओटीपोटातील पचनासाठी आवश्यक जीवजंतू सुस्थितीत राहण्यासाठी प्रि व प्रोबायोटिक औषधे त्याचप्रमाणे भूक वाढीसाठी औषधे देण्यात यावीत. आजारी जनावरांना औषधे पाजणे शक्यतो टाळावे. पावडर किंवा पातळ औषधे ही कणीक / पीठ / गुळ खुराक किंवा पाण्यातून देण्यात यावीत.

**ऊबदार निवारा**

जनावरांचे पाऊस व थंडीपासून संरक्षण करावे. जनावरे उघड्यावर बांधू नयेत. जनावरांना योग्य तो कोरडा व ऊबदार निवारा उपलब्ध करून द्यावा व त्यांचे पावसाच्या पाण्यापासून संरक्षण करावे. लहान वासराना अंगावरती ऊबदार कपडे पांघरावेत. गोठ्यात अधिक वॅटेजचे बल्ब लावावेत जेणेकरून उष्णता निर्माण होईल व प्रतिकूल वातावरणामुळे येणारा ताण टाळता येईल.

**पोळी पायावरील सुजेवर शेक देणे**

ज्या जनावरांना पाया समोरील लसीका ग्रंथीवर, पायावर किंवा छातीवर सूज आहे, अशा जनावरांना बसताना त्रास होतो म्हणून ती कित्येक दिवस उभी राहतात. अशा जनावरांना मीठाच्या संतृप्त (मीठ पाण्यात विरघळणे बंद होईपर्यंत बनवलेले पाणी) गरम द्रावणाचा सुती कापडाच्या सहाय्याने दिवसातून २ वेळा उत्तम शेक द्यावा. तसेच मॅग्नेशियम सल्फेट (बारीक पावडर) आणि ग्लीसरीन या संयुगाचा लेप सुजेवर सकाळ संध्याकाळी लावल्यास सूज कमी होण्यास मदत मिळते. अंगावरील गाठी व सूज कमी करण्यासाठी उन्हाच्या वेळेत गरम पाण्याची अंघोळ (शेकत / अंग चोळत) घालावी व अंग कापडाने कोरडे करावे म्हणजे सर्दी होणार नाही. लहान वासरांना चेहऱ्यावरील दुखऱ्या गाठीमुळे तोंडाची हालचाल करण्यास अवघड झाल्याने दुध पिता येत नाही. त्यासाठी चेहऱ्यावर गरम पाण्याने दिवसातून २ वेळा शेक द्यावा व अंग कापडाने कोरडे करावे.उगरम पाण्याचा चटका बसणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**बसून राहणाऱ्या जनावरांची काळजी**

पायावरील, गुडघ्यावरील सुजेमुळे उभे राहण्यास त्रास झाल्याने किंवा अशक्तपणामुळे रोगी जनावर नेहमी बसून राहते. अशा जास्त वेळ बसून राहणाऱ्या जनावरांना सिमेंट कॉंक्रीटची जमीन टाळावी. अंगाखाली मऊ गवत / तुसाची गादी करावी. अशा बसून राहणाऱ्या जनावरांना दर २-३ तासांनी बाजू बदलावी. दिवसातून दोन वेळा मदतीने उभे करावे. पाय चोळावेत व शेकावेत.

**तोंडातील व्रणोपचार**

जनावरांच्या विशेषत: लहान वासरांच्या तोंडात जखमा आढळून आल्यास, तोंड पोटेशियम परम्यांगनेटच्या द्रावणाने धुवून दिवसातून ३-४ वेळेस बोरोग्लोसरीनचे द्रावण तोंडातील जखमांवर लावावे. त्यामुळे जनावराला चारा खाण्यास / वासरांना दुध पिण्यास त्रास होणार नाही.

**नाकाची स्वच्छता व वाफ देणे**

रोगी जनावरांच्या विशेषत: लहान वासरांच्या नाकामध्ये काही वेळा अल्सर / जखमा निर्माण होतात, नाक चिकट स्त्रावांनी भरलेले असते. काही वेळा तो घट्ट व कडक होतो. त्यामुळे श्वसनास त्रास होतो. त्यासाठी कोमट पाण्यांनी नाकपुडी नियमितपणे स्वच्छ करावी तसेच दोन्ही नाकपुड्यात बोरोग्लोसरीन अथवा कोमट खोबरेल व बोरीक पावडरचे मिश्रण चार-चार थेंब टाकावे. जेणेकरून मऊपणा टिकून राहील, जखमा भरून येतील व श्वसनासही त्रास होणार नाही. सर्दी असेल तर निलगीरीच्या तेलाची किंवा विक्सची वाफ दिली तर चांगला फायदा होतो.

**डोळ्यांची निगा** डोळ्यात व्रण असतील तर डोळ्यातून पाणी येते व पूढे पांढरेपणा येतो. त्यासाठी डोळे बोरिक पावडरच्या द्रावणाने नियमीत धुवून घ्यावेत किंवा कोमट पाण्याने साफ करावेत.

**बैलांची काळजी** रोगातून बरे झालेल्या बैलांना कामास जुंपल्यामुळे रोग प्रकोप होऊन दगावत आहेत म्हणून प्रकृती ठणठणीत होईपर्यंत त्यांना कामास लावू नये.

**जखमांचे व्यवस्थापन** बाधित जनावरांमध्ये २-३ आठवड्यानंतर प्रामुख्याने सूज आलेल्या भागात विशेषतः पायावरती जखमा होतात. त्याचप्रमाणे शरीरावरील गाठी फुटून जखमा होतात. त्या जखमांवर उपचार करावा. यामध्ये जखमा ०.१ टक्के पोटेशियम परम्यागनेटच्या द्रावणाने धुवून घेतल्यानंतर त्यावर पोव्होडीन आयोडीन किंवा टिंक्चर आयोडीन लावावे आणि त्यानंतर जखमेवर मॅग्नेशियम सल्फेट व ग्लिसरीनचे मिश्रण लावून बँडेजने हळुवारपणे बांधावी. जखमांवर माश्या व इतर बाह्यपरजीवी बसू नयेत यासाठी दिवसातून दोन वेळा हर्बल स्प्रे जखम परिसरात फवारण्यात यावा. जखमेमध्ये अळया पडल्यास अशा जखमेत टर्पेंटाईनच्या तेलात भिजवून कापसाचा बोळा ठेवावा आणि त्यानंतर मृत अळ्या बाहेर काढून घ्याव्यात. अशा जखमांवर दिवसातून दोन वेळा हर्बल स्प्रे फवारण्यात यावा. जखमा जास्त खोल व दुषित प्रकारच्या असल्यास हायड्रोजन पिरॉक्साईडचा वापर करून अशा जखमांचा उपचार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करून घ्यावा. जखमा पूर्णपणे बऱ्या होण्यासाठी नियमित ड्रेसिंग करणे गरजेचे आहे.

**गोमाशांचा उपद्रव**

रोगी जनावर सुस्त झाल्याने तसेच अंगावर जखमा झाल्याने माश्या बसतात व जनावर त्रस्त होते. रोगी जनावरांना गोचीड-गोमाश्या यांचा त्रास कमी होण्यासाठी गोठ्यात दर ३-४ दिवसांनी कीटकनाशक औषधांची फवारणी करण्यात यावी. तसेच अंगावरती हर्बल / वनस्पतीजन्य कीटकनाशक औषधांचा नियमित वापर करावा. यासाठी एक लिटर पाण्यामध्ये १० मिली निंबोळी तेल, १० मिली करंज तेल, १० मिली निलगीरी तेल आणि २ ग्रॅम अंगाचा साबण मिसळावे व हे मिश्रण फवारणीसाठी वापरावे. एकूणच बाधित जनावरांच्या उपचारादरम्यान पशुपालकांनी आपल्या पशूंची काळजीपूर्वक सुश्रुषा केल्यास अनमोल पशुधन लम्पी आजारापासून वाचविण्यात यश मिळते.

**संकलन**
**– जिल्हा माहिती**
**कार्यालय, सांगली**

पान १ वरुन

### चंद्रावर भारताचा 'विक्रम'!

संशोधकांचे आणि देशवासियांचे अभिनंदन करत भारताच्या संकल्पाची ही पूर्तता असल्याचे गौरवोद्गार काढले.

पुढले पाऊल 'प्रज्ञान'चे..

'विक्रम'च्या यशस्वी अवतरणानंतर आता त्यामध्ये बसविलेला २६ किलो वजनाचा 'प्रज्ञान' हा रोव्हर चंद्रपृष्ठावर उतरेल. या स्वयंचलित रोव्हरमध्ये कॅमेऱ्यासह अन्य पृथ्थकरण पृत्थकरण पृथक्करण करणारी उपकरणे आहेत. त्याच्या मदतीने चंद्रपृष्ठावरील माती, वातावरण आदीचा अभ्यास केला जाईल. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर असलेले पाणी, अन्य महत्त्वाची खनिजे यांची माहितीही 'प्रज्ञान'च्या माध्यमातून गोळा केली जाईल.

शेवटची १५ मिनिटे..

'इस्रो'ने जाहीर केल्याप्रमाणे बुधवारी संध्याकाळी ५.४७ वाजता 'विक्रम'च्या अवतरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. चंद्रपृष्ठापासून ३० किलोमीटर उंचीवर असताना लँडर संपूर्णत: स्वयंचलित करण्यात आला. पृथ्वीवरील नियंत्रण कक्षातून त्याला कोणत्याही सूचना देण्यात आल्या नाहीत. लँडरची क्षितिज समांतर गती (हॉरिझाँटल व्हेलॉसिटी) कमी-कमी करत त्याची लंब गती (व्हर्टिकल व्हेलॉसिटी) वाढविण्यात आली. त्यामुळे चंद्रपृष्ठाला समांतर असलेले यान उभ्या स्थितीत आले. हे करत असतानाच ते हळू-हळू खाली उतरविले गेले.

### दहावी-बारावी बोर्डाची

अथवा टप्प्या टप्प्याने अर्ध्या अर्ध्या विषयांची परीक्षा देऊ शकतात.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या नव्या शैक्षणिक आराखड्यानुसार, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना यापुढे दोन भाषा अनिवार्य करण्यात आल्या आहेत. त्यापैकी एक भाषा भारतीय असायला हवी, अशी अट घालण्यात आली आहे. शिक्षण मंत्रालयाच्या माहितीनुसार, नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमाची ब्ल्यू प्रिंट तयार करण्यात आली आहे. २०२४ च्या शैक्षणिक सत्रासाठी पाठ्यपुस्तके तयार केली जाणार आहेत.

सध्याच्या कठीण बोर्ड परीक्षेतून विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी परीक्षेची सोपी पद्धत तयार करण्यात आली आहे. शिक्षणाच्या नव्या धोरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आकलन आणि यशाचे मुल्यांकन करता येईल. पूर्वी परीक्षेसाठी वर्षभर झटावे लागत होते. त्यामुळे काही विद्यार्थ्यांचे नुकसान होत होते. पण आता सर्वांना समान संधी मिळेल. नव्या धोरणांमुळे विद्यार्थ्यांना चांगली कामगिरी करण्यासाठी पुरेसा वेळ आणि संधी मिळावी यासाठी वर्षातून किमान दोनदा बोर्ड परीक्षा दिल्या जात आहेत, असे शिक्षण मंत्रालयाकडून सांगण्यात आलेय. बोर्ड परीक्षा वर्षातून दोन वेळा घेतल्या जातील. त्याशिवाय ज्या विषयांचा अभ्यास झालाय, फक्त त्याच विषायाची परीक्षा देऊ शकतील. तसेच एकाच वेळी सर्व विषयांचीही परीक्षा दोन वेळा देऊ शकतात. सर्वोच्च गुण ग्राह्य धरले जातील.

अकरावी-बारावीसाठी विषयांची निवड विद्याशाखानिहाय नसेल... (उदाहरण म्हणून पाहायचे झाल्यास, अकरावीचा विद्यार्थी कोणत्याही शाखेतील (कला, विज्ञान आणि वाणिज्य) एकत्र विषय निवडू शकतो. त्यामुळे यापुढे कला, वाणिज्य अथवा विज्ञान शाखा असा झापडबंद मार्ग राहणार नाही. कोणतेही विषय निवडण्याचे स्वातंत्र्य मिळेल. विद्यार्थ्यांची परीक्षा देण्याची क्षमता विकसित करण्याची जबाबदारी शाळांवर असेल. याशिवाय बोर्ड परीक्षा चाचणी डेव्हलपर आणि मूल्यांकनकर्त्यांना हे काम घेण्यापूर्वी विद्यापीठ-प्रमाणित अभ्यासक्रमांमधून जावे लागेल.

### इस्त्रोचा असाही विक्रम, ७०

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, ''जीवन धन्य झाले आहे. विजयाच्या मार्गावर चालण्याचा हा अभूतपूर्व क्षण आहे. आज भारतामधील प्रत्येक घरात सेलिब्रेशन सुरू झाले आहे. मी चांद्रयान-३ च्या टीमचे आणि देशातील शास्त्रज्ञांचे अभिनंदन करतो'' शास्त्रांच्या अथक परिश्रमामुळेच आपण चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पोहचण्यात यशस्वी झालोय. असा पराक्रम करणारा भारत पहिलाच देश आहे. आपण जमिनीला आई, आणि चंद्राला मामा म्हणतो. चांदो मामा खूप दूर आहे, असे म्हटले जात होते. पण आता असाही दिवस येईल, चांदो मामा फक्त एक पाऊल दूर आहे, असे मुलं म्हणतील.

### चांद्रयान ३ च्या यशस्वी लँडिंगनंतर

विद्यार्थी-पालक यांच्यासह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने हजर होते. विक्रम लँडरच्या सॉफ्ट लँडिंगचं थेट प्रक्षेपण या वेळेला रत्नागिरी शहरातील तारांगण येथे आयोजित करण्यात आलं होतं. विक्रम लँडरचे सॉफ्ट लँडिंग यशस्वी झाल्यानंतर उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांसह सर्वांनीच जयघोष करत आनंद व्यक्त केला. यावेळी आकाशात फुगे सोडून सर्वांना पेढे भरवून 'भारत माता की जय' अशा घोषणा देत उपस्थित असलेला प्रत्येक जण भारावून गेलेला दिसला.

चंद्रयान मोहिमेचे यश हा देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा असल्याचं म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी आपल्या भावना व्यक्त केल्या. भारताच्या चांद्रयानाचं विक्रम हे लँडर यशस्वीरित्या उतरल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या उत्स्फूर्त भावना व्यक्त केल्या. इस्त्रोच्या कमांड सेंटरमधून सुरु असलेले प्रक्षेपण 'वर्षा' निवासस्थानी मुख्यमंत्र्यांनी पाहिलं. मुख्यमंत्र्यांसह उपस्थित सर्वानीच आनंदाने टाळ्या वाजवून ही मोहीम फत्ते झाल्याबद्धल मिठाई वाटून आनंद साजरा केला.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील सर्वा शास्त्रज्ञांसह संपूर्ण इस्त्रो टीमचं अभिनंदन केलं आहे. यावेळी अजित पवार म्हणाले, 'चांद्रयान-३'ची मोहीम यशस्वी झाली, याचा फार आनंद आहे. भारत गेल्या अनेक दशकांपासून अंतराळ क्षेत्रातील महाशक्ती म्हणून कार्यरत होता. आजच्या चांद्रमोहिमेच्या यशानं त्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. अत्यंत कमी खर्चात नियोजनबद्ध पद्धतीनं ही मोहीम राबवण्यात आली. इस्त्रोच्या शास्त्रज्ञांनी त्यासाठी अपार कष्ट घेतले. महाराष्ट्रानंही आपलं योगदान दिलं. मुंबईतील गोदरेज एरोस्पेसमध्ये यानाचे काही भाग बनवण्यात आले. सांगलीत रॉकेटच्या पार्टना कोटींग करण्यात आलं. पुण्यातील कंपनीत फ्लेक्स नोझल आणि बुस्टर तर, जळगावात एचडी नोझल्स तयार करण्यात आले. बुलडाण्यातील खामगावाची चांदी आणि थर्मल फॅब्रिक चांद्रयानासाठी वापरण्यात आले. पुण्यातील जून्नरच्या दोन शास्त्रज्ञांनी मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. इंदापूरची वालचंद इंडस्ट्री गेली पन्नास वर्षे इस्त्रोच्या प्रत्येक मोहिमेत योगदान देत आहे. 'चांद्रयान-३'च्या यशस्वी मोहिमेत महाराष्ट्राचंही मोठं योगदान असून तेही कायम लक्षात ठेवलं जाईल.

### कासाळगंगा नदी प्रदूषण मुक्त करून

सामुहिक प्रयत्नाची आवश्यकता असल्याचे सांगितले.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे यांनी वृक्षलागवड रोजगार हमी योजनेतून करावी. तसेच कासाळगंगा नदीचा परिसर वृक्ष लागवड करून परिसरातील ग्रामपंचायती यासाठी योगदान देतील असेही शेळकंदे यांनी सांगितले. प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी कासाळगंगा नदीकाठच्या सर्व ग्रामपंचातीनी सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन ची कामे पुर्ण करणेचे सुचना दिल्या.

जिल्हा परिषदेचे नदीसाठी योगदान कौतुकास्पद :जलतज्ञ राजेंद्र सिंह

सोलापूर जिल्हा परिषदेने नदीसाठी दिलेले योगदान कौतुकास्पद असल्याचे मत जलतज्ञ राजेंद्र सिंह यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हा प्रशासन व नागरिक जलसंवर्धनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावत आहेत. ही बाब अत्यंत महत्त्वाची असून यातून या भागात जलक्रांती नक्की घडेल असे त्यांनी सांगितले. यासाठी खुप शुभेच्छा देत असल्याचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे जलतज्ञ राजेंद्र सिंह यांनी स्विडन येथून व्हीसी द्वारे बोलताना व्यक्त केले.

*प्लास्टिकचा वापर कमी करण्याबाबत शपथ : स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत ओडिएफ प्लस ला चालना देण्यासाठी व प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी प्रभारी जिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या उपस्थितीत सर्वांना शपथ देण्यात आली.

## मिलेटस खाद्यपदार्थ महोत्सवाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते उद्घाटन

सोलापूर/प्रतिनिधीः 'उमेद' अभियानच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या आवारात आयोजित करण्यात आलेल्या मिलेटस खाद्यपदार्थाच्या महोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रकल्प संचालक अमोल जाधव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, महेंद्र महाजन उपस्थित होते. यावेळी बचत गटातील महिलांशी संवाद साधताना मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती आव्हाळे म्हणाल्या की, उमेद बचत गटातील महिलांना प्रशिक्षण देण्याचा उपक्रम चांगला असून या प्रशिक्षणाचा फायदा महिला बचत गटांनी त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंचे पॅकेजिंग उत्कृष्टपणे करून मार्केटिंग ही करण्याच्या तंत्राचा अवलंब करावा. व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व्हावे असे आवाहन केले.

कासाळगंगा नदीकाठच्या पंढरपूर, सांगोला तालुक्यातील बचतगटांच्या महिलांना आत्मा च्या माध्यमातून सगरोळी ( जिल्हा नांदेड) येथील कृषी विज्ञान केंद्रातून 'मिलेटस' खाद्यपदार्थांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. उत्पादनासोबत पॅकिंग, मार्केटिंगची माहिती



देण्यात आली आहे. अशा प्रशिक्षित भगिनीनी ज्वारीसह बाजरी, नाचणी पासून तयार केलेले पौष्टीक, आरोग्यदायी, रुचकर खाद्यपदार्थ प्रदर्शनात ठेवण्यात आलेले होते. या महोत्सवातील खाद्यपदार्थांच्या स्टॉलला नागरिकांचाही चांगला प्रतिसाद मिळाला व येथील आरोग्यदायी व पौष्टिक खाद्यपदार्थांची खरेदी केली.

*आरोग्यदायी खाद्यपदार्थ : प्रदर्शन आणि विक्री उपक्रमांतर्गत उपलब्ध होणारे आरोग्यदायी 'मिलेटस' खाद्यपदार्थ खाली दिल्याप्रमाणे...* ज्वारीची शेव, शंकरपाळ्या, चकली, बिस्कीट, लाडू *नाचणीचे बिस्कीट, लाडू * ज्वारी व बाजरीचे मिक्स सूप * थालीपीठ भाजणी * दलिया, मिक्स बाजरी थालीपीठ * बाजरी व ज्वारीच्या लाह्या

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# हिप्परगा तलावाचे पाणी कुरनूर धरणात तात्काळ सोडा

## विविध प्रश्नांसाठी शिष्टमंडळाने घेतली जिल्हाधिकाऱ्यांची भेट

अक्कलकोट/प्रतिनिधीः हिप्परगा तलावातुन कुरनूर धरणात तात्काळ पाणी सोडावे,पीक विम्याची अग्रीम रक्कम दिवाळीपूर्वी मिळावी यासह रखडलेले कांदा अनुदान व मागील वर्षीची अतिवृष्टीची रक्कम तात्काळ वितरित करण्याच्या मागणीसाठी माजी मंत्री



सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने प्रभारी जिल्हाधिकारी मनीषा आव्हाळे यांची भेट घेतली.सध्या पावसाअभावी शेतकऱ्यांची परिस्थिती खूपच बिकट आहे अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत मोलाचे ठरणाऱ्या एकरुख योजनेच्या माध्यमातून उजनीचे पाणी कुरनूर धरणात यावे यासाठी गेल्या दोन दशकांपासून पाठपुरावा सुरू आहे.वेळोवेळी सत्तेतील मंत्र्यांचे सहकार्य मिळवत ही योजना अंतिम टप्प्यात आणली आहे. सद्यस्थितीत अनेक दिवसांपासून पावसात मोठा खंड पडल्याने अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील खरीप पिकांसह ऊसाचे पीक अडचणीत सापडले आहे. उभे पीक शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत करपुन चालले आहेत. भविष्यातील पिकांच्या नियोजनासाठी एकरुख योजनेचे पाणी लाखमोलाचे ठरणार आहे म्हणुन उजनीचे आमच्यासाठी हक्काचे असणारे एकरुख योजनेचे पाणी हिप्परगा तलावातुन कुरनूर धरणात सोडण्याची आम्ही मागणी केली आहे.शिवाय अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील बहुतांश शेतकरी हे खरीप हंगामातील पिकांवर अवलंबून असतात.संपुर्ण वर्षाचे अर्थकारण हे पुर्णतः खरीप हंगामातील तुर, सोयाबीन, मुग, उडीद, भुईमुग यांसह इतर पिकांवर अवलंबून असते.मात्र पावसात पडलेल्या मोठ्या खंडामुळे खरीपातील सर्व पिके जळुन चालली आहेत.ही पिके गेल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. त्यांना शासकीय स्तरावरून आर्थिक मदत मिळण्याशिवाय दुसरा पर्याय राहिला नाही. प्राप्त परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्यांनी पिकांच्या जोखमेपोटी खरीप हंगाम २०२३ साठी पीकविमा योजनेत सहभाग घेतला आहे. यास अनुसरून आपल्या स्तरावरुन शेतकऱ्यांना अग्रीम रक्कम दिवाळीपूर्वी मिळावी यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. तसेच विमा उतरवलेल्या सर्व शेतकऱ्यांना जोखमेपोटी १०० टक्के नुकसान ग्राह्य धरून पीक विम्याची पुर्ण रक्कमदेखील मिळावी यासाठी कार्यवाही करावी. सरकारच्यावतीने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान रक्कम देण्यासंदर्भात घोषणा करण्यात आली. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून सदर अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांना मिळाली नाही. कांद्याला योग्य भाव न मिळाल्याने आधीच संबंधित शेतकरी अडचणीत आले असताना आता पावसाच्या लहरीपणाने त्यात भर पडली आहे. म्हणुन कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी अनुदानाची रक्कम तातडीने खात्यात जमा करण्यात यावी. मागील वर्षी राज्य सरकारने घोषित केलेल्या अतिवृष्टीची रक्कमदेखील कित्येक शेतकऱ्यांना मिळाली नाही.ती रक्कम देखील बाधित शेतकऱ्यांना वितरित करण्यासंदर्भात आपल्या स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती म्हेत्रे यांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश आचलारे,सिद्धार्थ गायकवाड,नागराज पाटील,तुकाराम कोळेकर,बाबू चव्हाण, अनिल देवकर,सुनील देवकर,विठ्ठल हक्के,चंद्रकांत चव्हाण,सज्जन पाटील, सचिन माने,विक्रम मेटकरी,लिंगराज पाटील,राहुल चौधरी,गणेश काकडे,गौरीशंकर स्वामी,सोमनाथ चिकलंडे,शरणाप्पा चौंडे, सरदार शेख,पदमसिंह पाटील,अर्जुन घंटे,शाकिर शेख,अक्षय तरंगे आदिंसह शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सरकारचे शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष


शेतकऱ्यांची परिस्थिती एवढी बिकट असताना सरकारला त्याचे काहीही देणे घेणे नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे साफ दुर्लक्ष आहे. आज पाऊस नसल्याने शेतकऱ्यांची अवस्था न सांगण्या पलीकडे आहे. सरकारने आम्ही केलेल्या मागण्यांकडे लक्ष देऊन कार्यवाही करावी.यातून शेतकऱ्यांना थोडासा तरी दिलासा मिळेल.

**–सिद्धाराम म्हेत्रे,माजी मंत्री**

# रायगड जिल्हा परिषद शाळेची दुरावस्था !

## खारघर–फरशीपाडा शाळेतील विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधारात !

पनवेल/प्रतिनिधी : पनवेल महानगरपालिका क्षेत्रात असलेल्या खारघर – फरशीपाडा येथील रायगड जिल्हा परिषद शाळेची अत्यंत दुरावस्था झाली आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे शाळेची इमारत अत्यंत जुनाट आणि पडक्या स्थितीत आहे. पडकी इमारत, ना लाईट, ना पाणी अशा भयंकर परिस्थिती विद्यार्थी शिकत आहेत.मागील १३ वर्षांपासून विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. कोणत्याही क्षणाला शाळेची इमारत कोसळून मोठी दुर्घटना होण्याचा धोका निर्माण झाला आहे. मात्र, रायगड जिल्हा परिषदेचे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे . असा आरोप शाळेचे शिक्षक व रमजान शेख यांनी केला आहे. येथे शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या न्याय–हक्कांसाठी होप मिरर फाउंडेशन संस्थेचे अध्यक्ष रमझान शेख यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी शाळा आणि तेथील विद्यार्थी व त्यांच्या पालकांना भेट दिली. सदर शाळेमध्ये २० मुली व २० मुले शिकतात. चौथी वर्गापर्यंत शाळा आहे. मात्र, १३ वर्षांपासून शाळेची अवस्था बिकट आहे. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर व मनावर होत आहे.



दरम्यान सदर प्रकरणी रमजान शेख यांनी आक्रमक भूमिका घेत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. रायगड जिल्हाधिकारी, तर पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त, कोकण आयुक्त, पनवेल गटशिक्षणाधिकारी, खारघर पोलीस स्टेशन यांची भेट घेऊन पनवेल तालुक्यातील खारघर जवळील फरशीपाडा रायगड जिल्हा परिषद शाळेची झालेल्या दुरावस्थेची दखल घेणेबाबतचे निवेदन रमझान शेख यांनी दिले आहे. स्थानिक प्रशासनाने यावर तातडीने कार्यवाही न केल्यास राज्याचे मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री यांची देखील भेट घेणार असल्याचे रमझान शेख यांनी पत्रकारांना सांगितले.

# पंढरपूर येथे माणुसकी वृद्धाश्रम सुरु


पंढरपूर/प्रतिनिधी :संघर्ष नेहरू युवा मंडळ, वाखरी ही पंढरपूर स्थित स्वयंसेवी संस्था असून सदर संस्था युवक कल्याण, महिला बालविकास, पर्यावरण संवर्धन अशा विविध विषयांमध्ये गेल्या १४ वर्षापासून कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून २१ ऑगस्ट या जागतिक जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून श्री संत नारायण देव बाबा भक्त निवास, चंद्रभागा बस स्थानकाशेजारी, बायपास रोड, पंढरपूर येथे माणुसकी वृद्धाश्रम सुरु करण्यात आले आहे. सदर वृद्धाश्रमामध्ये सर्व जाती धर्माच्या निराधार तसेच गरजू जेष्ठ नागरिकांना निशुल्क प्रवेश देण्यात आहे. जेष्ठांच्या आयुष्याची संध्याकाळ ही आनंददायी व्हावी या उद्देशाने वृद्धाश्रमाची सुरवात करण्यात आली आहे.. सदर वृद्धाश्रमाचे उद्घाटन प्रसंगी




प्रमुख पाहुणे सूरज पोळ, संचालक, सेंटर फॉर ई–गव्हर्नन्स ट्रेनिंग न्ड रिसर्च, पुणे तसेच संस्थेचे अध्यक्ष नागनाथ पांढरे, सचिव सौदागर जगदाळे, खजिनदार शाकिर मुजावर, शिवेश्वर परिवार सदस्य फंचीबापू शिंदे. तसेच संस्थेचे विश्वस्त, पदाधिकारी नागरिक उपस्थित होते. गरजू व निराधार वृद्धांनी प्रवेशाकरीता ९८८१३६११९५, ७९२७७६८९८७, या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच समाजातील सजग नागरिकांनी गरजू वृद्धांपर्यंत सदर माहिती पोहचविण्याचे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.

# कर्मवीर सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरण सप्ताह निमित्त शक्तिमान भारत हेल्थ कार्ड शिबिर

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मयोगी श्रद्धेय सुधाकरपंत परिचारक यांच्या तृतीय पुण्यस्मरण सप्ताह निमित्त सत्यविजय मोहोळकर यांनी वार्ड क्रमांक ७ नागरिकांसाठी आम्ही भारत हेल्थ कार्ड शिबिर नोंदणी केली होती सदर कार्यक्रमाचे उद्घाटन श्री प्रशांतराव परिचारक यांनी केले व प्रतिमापूजन श्री लक्ष्मण शिरसाठ यांनी केले यावेळी प्रशांत परिचारक म्हणाले की अनेक कुटुंबे एकत्रितपणे संकटात येत असतात त्यावेळेस त्या कुटुंबांना मतीची गरज असते ही गरज आपल्या कुटुंबांना हेल्थ कार्ड काढले तर पाच लाखापर्यंत ची मदत होणार आहे याच्या काही नियम अटी आहेत ज्यांनी स्वतःचा पेशंट हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करतो त्यावेळेस या कार्डाची नोंद करणे आवश्यक आहे योग्य मग त्या कार्डाचा वापर तुम्हाला होत आहे स्थानिक पंढरपूर थेट आठ हॉस्पिटल संपूर्ण कुटुंबातील माणसांना किडनी लिव्हर मेंदू रो असे रोग निदान कार्ड एका कुटुंबाला सामूहिक आधार अमानुष हेल्थ कार्ड काढले तर त्याचा शोध घेतला



या कार्यक्रमास लक्ष्मण शिरसाठ रा पा कटेकर इब्राहिम बोरी संजय निंबाळकर बशीर तांबे अनिल अभंगराव कल्याणराव कोल्हे संजय जंजाळ नगरसेविका मोहोळकर व तसेच वार्डातील सर्व महिला व नागरिक उपस्थित होते

हे शिबिर २७ मोहोळकर यांनी पहिला स्तुत उपक्रम केला आहे सदर कार्यक्रमास ४५० नागरिकांनी सहभाग घेतला आहे सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्य विजय मोहोळकर यांनी केले व आभार आरवी यांनी मानले

# इटकूर प्रशालेस सीईओ राहुल गुप्ता यांची भेट

कळंब/प्रतिनिधीः कळंब तुक्यातील जि. प. प्रशाला इटकूर ता. कळंब या प्रशालेस उस्मानाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गुप्ता यांनी अकस्मात भेट दिली. यावेळी शालेय



व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ यांनी लोकसहभागातून शाळेला सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आलेली होती त्याचे राहुल गुप्ता यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त करत सीईओ साहेबांनी प्रशालेतील गतवर्षीच्या नवोदय, शिष्यवृत्ती, सैनिक स्कूल परीक्षा या स्पर्धा परीक्षेत प्रशालेने मिळवलेल्या उत्तुंग यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले. तसेच प्रशालेची गरज पाहता प्रशालेसाठी संरक्षक भिंत, खेळाचे मैदान आणि मुख्य इमारत हे प्रस्ताव मान्य करून कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनंत आडसूळ यांनी केले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिदास पावले, सरपंच हनुमंत कस्पटे, मुख्याध्यापक तुकाराम गरुडे, केंद्रीय मुख्याध्यापक श्रीम. शारदा मुंढे, सचिन गंभीरे, अभयसिंह आडसूळ, बालाजी देसाई, राजकुमार आडसूळ, बिभीषण देसाई, अमोल कांबळे, हेमंत पोते व इतर शिक्षण प्रेमी नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशालेतील शिक्षक अनिल क्षिरसागर यांनी केले तर आभार प्रदर्शन वृषिकेत चौधरी सर यांनी केले.

# शंकर म्हेत्रे वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

अक्कलकोट/प्रतिनिधीः काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजकांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.



येत्या २५ ऑगस्ट रोजी म्हेत्रे यांचा वाढदिवस आहे. याचेच औचित्य साधून लोकोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. डोळे तपासणी, रक्तदान, दात तपासणी, विविध आजारांची तपासणी करणे, त्याचबरोबर विद्यार्थ्यांना वही वाटप, उत्पन्न दाखले काढणे, वृक्षारोपण करणे, रहिवाशी दाखले काढणे असे अनेक उपक्रम दुधनी येथे मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहेत. म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदाही अनेक सामाजिक व प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. म्हेत्रे परिवाराने विजय असो किंवा पराभव असो कायमच जनतेशी नाळ कायम ठेवलेली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रेमापोटी कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्याकडून यावर्षीदेखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या उपक्रमांचा दुधनी शहर व परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ऑस्ट्रेलियन शिष्टमंडळाने घेतली उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांची भेट महिला सुरक्षा, शोषण यावर झाली चर्चा

मुंबई : ऑस्ट्रेलियाचे उप महावाणिज्यदूत मायकेल ब्राऊन आणि मुंबईतील महावाणिज्यदूत कार्यालयाच्या प्रमुख मॅजेल हाइड यांच्या शिष्टमंडळाने आज उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची विधानभवनात सदिच्छा भेट घेतली.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी विधानभवन कार्यपद्धती याचबरोबर सर्वपक्षीय आमदारांचे शिष्टमंडळ युरोप दौऱ्यावर जाणार असल्याचीही माहिती दिली. यामध्ये जास्तीत जास्त महिला आमदार आहेत. महाराष्ट्रात स्त्री आधार केंद्राच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण आणि सुरक्षा, त्यांचे हक्क यासाठी होत असलेल्या कामाची माहिती दिली.

राज्यात प्रत्येक पोलीस स्टेशनच्या अखत्यारित असलेल्या महिला दक्षता कमिटीच्या माध्यमातून ज्या सामाजिक संस्थांमधून महिलांविषयक कार्य केले जात आहे त्यांचे समुपदेशनसुद्धा या माध्यमातून सुरू आहे. वाणिज्यदूतांमार्फत त्या संस्थेला निधी उपलब्ध करून दिला तर त्याचा लाभ होईल, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

पोलीस हेल्पलाईन सुरू केल्याने विविध अल्पवयीन मुलींचे विवाह रोखण्यास प्रशासनाला यश आले आहे. महिलांमध्ये आपल्या हक्काची जागृती येण्यासाठी पोलिसांसाठी 'स्त्री–पुरुष समानता: पोलीस मार्गदर्शक' पुस्तिका तयार केली आहे. याच्या माध्यमातून आणि ऑनलाईन बैठकातूनही पिडीत महिला, मुली यांना प्रशिक्षणाद्वारे आधार देण्याचे काम आगामी काळात करण्यात येणार असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.



येत्या १३ सप्टेंबर २०२३ रोजी विधानभवनामध्ये 'फेमीनिस्ट फॉरेन पॉलिसी' यावर कार्यशाळा होणार असून यामध्ये जपान, मेक्सिको, नेदरलँड, स्पेन, जर्मनी, फ्रान्स, कॅनडा यांचे वाणिज्यदूत सहभागी होणार आहेत. यामध्ये ऑस्ट्रेलियाच्या वाणिज्यदूताने सहभागी व्हावे याबद्दल मायकेल ब्राऊन आणि श्रीमती हाइड यांना डॉ. गोऱ्हे यांनी निमंत्रण दिले.पोलीस मार्गदर्शक पुस्तिका जास्तीत जास्त महिलांपर्यंत प्रसारित होण्यासाठी ऑस्ट्रेलियन महावाणिज्यदूत सहाय्य करेल, असे श्री. ब्राऊन यांनी सांगितले.

# निफाड तालुक्यात एकलव्य आदिवासी संघटनेचे शाखा फलकाचे ठिकठिकाणी अनावरण

निफाड/प्रतिनिधी : एकलव्य आदिवासी परिषद संघटना महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष मंगेश औताडे यांच्या नेतृत्वाखाली निफाड तालुक्यात बरड वस्ती, राणवड, धारणगाव वीर या ठिकाणी मोठ्या समाज बांधवांच्या उपस्थित एकलव्य आदिवासी परिषद या शाखा फलकाचे अनावर करण्यात आले

या प्रसंगी नवयुक्त तालुकाध्यक्ष रमेश मोरे व युवा तालुका अध्यक्ष मदन मोरे व यांचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच करण्यात आले याप्रसंगी संघटनेचे संस्थापक मंगेश औताडे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की आदिवासी समाज हा या सृष्टी वरचा मुळ रहिवासी असून या समाजाला आजपर्यंत सर्व क्षेत्रातून डावलेले आहे परंतु आता संघटनेच्या माध्यमातून आम्ही समाजामध्ये जनजागृती, कायदेविषयक अभ्यास, समाजाचे प्रश्न मार्गी लावून समाजातील विघातक घटक वगळून टाकू, समाजावर होणारे अन्याय अत्याचार यावर आवाज महाराष्ट्रभर आवाज उचलत असतो परंतु निफाड तालुक्यात सामान्य कार्यकर्त्यांना आम्ही कायद्यांच्या माध्यमातून युवकांना मार्गदर्शन करुन स्वावलंबी बनवु असे ते शेवटी म्हणाले, या प्रसंगी पत्रकार ह भ प थोरात महाराज म्हणाले की समाजाला मंगेश औताडे यांच्या माध्यमातून कोहिनूर हिरा मिळाला असुन समाजाने त्यांना खंबीर साथ देऊन पाठी मागे उभे राहिले पाहिजे,समाजावर होणारे अन्याय अत्याचार या विरोधात क्रांती ची मशाल हातात घेऊन हक्क अधिकार मिळवण्यासाठी संघटनेची गरज असते यामुळे सर्वांनी मंगेश औताडे यांच्या मागे न डगमगता खंबीर उभे राहावे असे मोलाचे मार्गदर्शन केले याप्रसंगी प्रदेश उपाध्यक्ष किरण गांगुर्डे,राज्य संघटक विजय कंक, राज्य मार्गदर्शक विश्वास आहेरे, जिल्हा मार्गदर्शक प्रकाश शिंदे, युवा जिल्हाध्यक्ष भगवान मोरे जिल्हा



उपाध्यक्ष किरण बेर्डे,शरद माळी जिल्हा अध्यक्ष टायगर फोर्स, उ जि अ ठाकरे काका,चांदवड तालुका गुलाब बर्डे ,तालुका उप अध्यक्ष दिलीप कंक,युवा तालुका अध्यक्ष किरण बर्डे, उप अध्यक्ष सुनील गोरे, ता संघटक विक्रम गांगुर्डे,सागर वाघ सिन्नर तालुका अध्यक्ष,विलास वाघ तालुका उप अध्यक्ष निफाड, नवनाथ भगरे तालुका संघटक, पिंटू माळी तालुका संघटक,विजय गावित,किरण पवार,अर्जुन भगरे , शाम पवार,अजय ठोंबरे,सनी गांगुर्डे,मंगेश पवार,इत्यादी कार्यकर्ते मोठे संख्येने उपस्थित होते